# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ क्र.:पुवि/निववि/

दिनांक : ०९/०७/२०११

प्रति,

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.

२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय:— मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथलयामध्ये भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेले परिभाषा कोश ठेवणे अनिवार्य करण्याबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाकिंत संदर्भानुसार महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. सकीर्ण— २०११/(११८/११)/समन्वय, दिनांक १७ जून, २०११चे परिपत्रक आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

तरी सर्व महाविद्यालयानी याबाबत त्वरित नोंद घ्यावी. ही विनंती

उपकुलसचिव
नियोजन व विकास

DEVELOPMENT SECTION
INWARD NO. 1177
DATE 4/7/11

UNIVERSITY OF PUNE (General Section) 29 JUN 2011 Inward No. 864

Inward No.: 2419
Date : 01/07/2011
BCUD
University of Pune

मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेले परिभाषा कोश ठेवणे अनिवार्य करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०११/ (११८/११)/ समन्वय
दिनांक १७ जून , २०११.

**प्रस्तावना**:- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मधील तरतूदीनुसार दिनांक १ मे १९६६ पासून सर्व शासकीय कार्यालयातील कामकाज मराठीतून करण्याविषयी शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित होतात. तथापि मराठीचा वापर १०० टक्के होत नसल्याचें शासनाच्या निदर्शनास आले आहे. राज्यातील सर्वसामान्य माणसाच्या हिताच्या आणि शासन लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीकोनातून शासकीय सर्व कामकाज मराठी भाषेमध्ये होणे आवश्यक आहे. त्या करीता शब्दांची अडचण येऊ नये म्हणून शासनाने भाषा संचालनालयामार्फत वेगवेगळया विषयांचे एकूण ४८ परिभाषा कोषांची निर्मिती करुन प्रकाशित केले आहेत. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे हे सर्वमान्य असल्यामुळे विद्यापीठीय शिक्षण मराठी माध्यमातून घेताना अडचणी येऊ नयेत तसेच इतर सर्व क्षेत्रामध्ये समान व एकरुप परिभाषा वापरली जावी यासाठी शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेले ४८ परिभाषा कोष सर्व मराठी व इंग्रजी माध्यमाच्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये ठेवणे अनिवार्य करण्यात यावे असे शासनाच्या विचाराधीन होते.

**परिपत्रक** :- महाविद्यालयात शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे हे सर्वमान्य असल्यामुळे विद्यापीठीय शिक्षण मराठी माध्यमातून घेताना अडचणी येऊ नयेत तसेच इतर सर्व क्षेत्रा मध्ये समान व एकरुप परिभाषा वापरली जावी या साठी शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोषाचा वापर होणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन स्तरावर सर्व विषयातील अभ्यासामध्ये मराठी भाषेतील शब्दांचा वापर होण्यासाठी व मराठी शब्दांचा अपरिचीतपणा दूर करण्यासाठी भाषा संचालनालयामार्फत प्रकाशित केलेले ४८ परिभाषा कोश शासनाच्या http://gad.intranet.maharashtra.gov.in वेबसाईटवर भाषा संचालनालयातील प्रकाशने येथे परिभाषा कोश उपलब्ध करुन दिले आहेत. ते सर्व अकृषि विद्यापीठे आणि सर्व मराठी व इंग्रजी माध्यमाच्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये ठेवणे अनिवार्य करण्यात येत आहे.

हे शासन परिपत्रक शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०६१७१२४७४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

**दि.धों. तिवरेकर**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई